संक्षिप्त फौ. ख. क्र. ७२४/२०१९
सरकार वि. प्रशांत व इतर
निशाणी– ३५.

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी.</u>**
**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

**<u>माझे नाव</u>** – सुशांत रामदास मरकट,
**<u>वय</u>**– ३७ वर्ष– धंदा– पोलिस हवालदार ब. क्रं. २३७६.
**<u>नेमणूक</u>** – पोलिस मुख्यालय नाशिक, ता. नाशिक, जि. नाशिक.

............................................................................................................

**<u>सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. दिनांक १४/०८/२०१९ रोजी मी पोलिस हवालदार म्हणून स्थानीक गुन्हे शाखा नाशिक येथे कार्यरत होतो. त्या दिवशी मी, ए. एस. आय. पगारे, पो. ह. गोसावी, पो. कॉ. मंगेश गोसावी, पो. कॉ. हेमंत गिलबिले स्थानीक गुन्हे शाखा नाशिक येथे कार्यरत असतांना आम्ही चांदवड पोलिस हद्दीत असतांना श्री. के. के. पाटील यांनी फोनद्वारे आम्हांला कळविले की, राजवाडा चांदवड येथे तिरट नावाचा जुगार खेळल्या जात आहे. त्या माहितीवरुन आम्ही चांदवड पोलिस स्टेशनचे ए. एस. आय. सलिम शेख, पो. ह. विजय जाधव, पो. ह. ललीत चौरे यांना दोन पंचासह चांदवड चौफूली येथे कार्यवाई करीता बोलाविले. त्यानंतर त्यांना ए. एस. आय पगारे यांनी मिळालेल्या माहिती बाबत माहिती दिली. त्यानंतर खाजगी वाहनाद्वारे राजवाडा चांदवड या ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी डॉ. बाबा साहेब आंबडेकर चौकात काही इसम दिसले. त्यांच्या हातात पत्ते होते. आमची व पंचांची खात्री झाल्यानंतर आम्ही १८.०० वाजताच्या दरम्यान त्या ठिकाणी छापा टाकला व सहा इसमांना त्या ठिकाणी जागीच पकडले. त्या ठिकाणी आम्ही आमची व पंचांची ओळख दिली. त्यांना त्यावेळी त्यांचे नाव गाव विचारले त्यावेळी त्यांनी त्यांचे नाव प्रशांत भदाणे, इश्वर जाधव, प्रमोद जाधव, प्रविण साळवे, रविंद्र निरभवणे, राजेश बनकर असे सांगितले. त्यावेळी त्यांना अंगझडतीचा उद्देश समजावून सांगितला व त्यांची अंग झडती घेतली त्यावेळी त्यांच्याकडे बावन पानी पत्याचा कॅट, सहा मोबाईल, रोख रक्कम असा एकूण ५१,१९०/– चा मुद्देमाल

सापडला. त्या ठिकाणी पंचांसमोर पंचनामा केला व पंचांची सहीचे कागदी लेबल लावून मुद्देमाल जागीच सिल केला. पंचनामा चांदवड पोलिस स्टेशनचे ए. एस. आय. सलिम शेख यांनी केला. त्यानंतर सहा आरोपी व मुद्देमाल पोलिस स्टेशनला आणला व मी फिर्याद दिली. आता मला फिर्याद व छापील प्रथम अहवाल दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला अनुक्रमे **नि. क्रं. ३६ व ३७** देण्यात आला. भरपूर दिवस झाले असल्याने मी आरोपींना ओळखू शकत नाही.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. व्ही. व्ही. जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

२. आम्ही ज्या वाहनाने छापा टाकण्याकरीता गेलो होतो त्या वाहनाचा क्रमांक मला सांगता येणार नाही. ज्या ठिकाणी छापा टाकला त्या गाळयाचा नगरपरिषद मालमत्ता क्रमांक मला सांगता येणार नाही. गाळा कोणाच्या मालकीचा होता याबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी आम्ही कार्यवाई केली तो परिसर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक म्हणून प्रसिद्ध आहे व त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी पूर्व–पश्चिम प्रशासकीय इमारतीकडे जाणारा रस्ता आहे. हे मला माहिती नाही की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या उत्तर बाजूला व्यायाम शाळा आहे किंवा कसे. हे मला माहिती नाही की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या दक्षिण बाजूला ब्लू प्यंथर युवा प्रतिष्ठाण चे कार्यालय आहे किंवा कसे. हे मला माहिती नाही की, त्या ठिकाणी पुतळयाच्या सुरक्षेकरीता चांदवड पोलिस स्टेशनमार्फत सुरक्षा रक्षक असतो किंवा कसे. आरोपींकडून जप्त केलेल्या नोटांचे वर्णन व क्रमांक मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की, कोणत्या आरोपीकडून कोणती रक्कम मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस विभागामार्फत वेळोवेळी प्रतिबंधात्मक कार्यवाई केल्या जाते. हे म्हणणे खरे नाही की, अशा कार्यवाईच्या वेळी बेवारस मुद्देमाल मिळून येतो. हे मला माहिती नाही की, आरोपी ब्यु प्यंथर युवा प्रतिष्ठांचे कार्यकर्ते आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिबंधात्मक कार्यवाई करते वेळी आम्हांला बेवारस मुद्देमाल मिळून आला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे

खरे नाही की, सरतपासात सांगितले तशी कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काहीनाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.08.26 18:22:18 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.08.26 18:22:23 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

**दिनांक – २६/०८/२०२५**